


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २९६ ●सोमवार, दि.२६ जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955




# बीड बसस्थानकाच्या बोगस कामाची पाहणी करून पहा 'दादा' एकदा

● १३ कोटी निधी खर्च झाला कुठे; ● जुन्याच कठड्यांना रंग रंगारी
● पावसाळ्या आधीच पाणी साचण्याचे प्रकार; ● दोन कोटी तरी खर्च केला का?



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील एसटी बस स्थानकाच्या उभारणीदरम्यान मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. कन्स्ट्रक्शन कंपनीला २२ कोटी रुपये खर्च देऊन उभारण्यात आलेल्या या बस स्थानकाच्या बांधकामाच्या दर्जावर नागरिक आणि प्रवासी प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. बस स्थानकाचे काम पूर्ण होऊन अल्प कालावधी लोटला असतानाच , पिण्यासाठी व स्वच्छतागृहासाठी एकच टाकी,भितींना तडे जाणे, छत गळणे, फरशी उखडणे तसेच पावसाळ्या आधीच पाणी साचण्याचे प्रकार समोर आले आहेत. यामुळे बांधकामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरण्यात आल्याचा आरोप होत आहे. बांधकाम करत असताना कॉलममधील फु टिंगा उघड्या ठेवूनच कॉलमची उभारणी केली आहे. ज्याने वाऱ्यावादळात इमारतीला धोका होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या-स्थितीला उभारण्यात आलेल्या ▶ उर्वरित पान २ वर

**बीड बस स्थानक बांधकामातील गैरव्यवहाराची चौकशी करा, अन्यथा उपोषण करू...**

शहरातील एसटी बस स्थानकाच्या बांधकामात झालेल्या कथित गैरव्यवहाराविरोधात नागरिकांचा संताप वाढत असून, तातडीने चौकशी न के ल्यास आमरण उपोषण छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेल्या बस स्थानकात अल्पावधीतच भेगा, गळती आणि निकृष्ट कामाचे प्रकार समोर आले आहेत. मंजूर आराखड्याला बगल देऊन निकृ ष्ट साहित्याचा वापर करण्यात आल्याचा आरोप नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी के ला आहे. ठेकेदार आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने निधीचा अपहार झाल्याचा संशय व्यक्त होत आहे.

# जुन्यांचे पगार होत नसताना नवीन ११४ गटसचिवांच्या नियुक्त्या: डीसीसीला अजून बुडवण्याचा प्रयत्न

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही गेल्या कित्येक वर्षांपासून अडचणीत सापडली आहे. शासनाच्या आदेशातील तरतुदींचे उल्लंघन करून जिल्हा उपनिबंधक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, केडर यांनी एकशे चौदा नवीन गट सचिवांच्या नियुक्ती करून तरतुदींचे उल्लंघन करत काम केले आहे. यात आर्थिक उलाढाल देखील मोठी झाली असल्याची माहिती प्राप्त होत आहे. शासनाने बँकांची आर्थिक परिस्थिती पाहून गट सचिवांचे पगार होतील का ? या सर्व बाबींची पडताळणी करून त्याचप्रमाणे जिल्हा बँकेची कर्ज वसुली किती आहे ? त्या कर्ज वसुलीतून मिळणाऱ्या दोन टक्के रकमेतून गट सचिवांचे पगार होतील का ? अशा अनेक बाबींची पूर्तता होत असेल तर कंत्राटी गट सचिवांना कायम स्वरूपी ▶ उर्वरित पान २ वर



**दरम्यान या प्रकरणांमध्ये ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा प्रणित भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम .देशमुख यांनी लक्ष घालावे, अशी मागणी देखील तक्रारदाराने केली आहे. आपले नाव गोपनीय ठेवण्याची विनंती देखील तक्रारदाराने त्यांना केली आहे.**

# प्रजासत्ताक दिन:महाराष्ट्रातील ४ दिग्गजांना पद्म पुरस्कार, देशातील ४५ जणांचा होणार सन्मान

**नवी दिल्ली**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारकडून पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. वेगवेगळ्या क्षेत्रातील दिग्गजांना पद्म पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. केंद्र सरकारकडून एकूण ४५ दिग्गजांसाठी पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे.



यामध्ये ४ महाराष्ट्रातील दिग्गज व्यक्तींचा समावेश आहे. या सर्व दिग्गजांना प्रजासत्ताक दिनी आयोजित कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पद्म पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील उत्कृष्ट तारपावादक भिकल्या लाडक्या धिंडा यांना पद्म पुरस्काराची घोषणा झाली आहे. यासोबतच ▶ उर्वरित पान २ वर

# बीड की बिहार? चौघांची लोखंडी रॉड, काठ्या, चाकूने तरुणाला मारहाण



**शिरूर का. । प्रतिनिधी**

तालुक्यातील खालापुरी येथील एका हॉटेलमध्ये ४ जणांनी एका तरुणावर लोखंडी रॉड, चाकू व लाकडी काठ्यांनी हल्ला चढविला. दरम्यान या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडिओ व्हायरल झाल्यामुळे खळबळ माजली आहे. या हल्ल्यात नितीन लोंढे (वय ३२) हा तरुण गंभीर जखमी झाला आहे. विशेष म्हणजे ही संपूर्ण मारहाण हॉटेलमधील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, संबंधित व्हिडीओ ▶ उर्वरित पान २ वर



*बीड : रविवारी रात्री ९.४० वाजता जालना रोडवरील द्वारकादास कपड्याच्या दुकानासमोर दुचाकीवरून जात असलेल्या आई-मुलाकडून पाठीमागून आलेल्या चोरट्यांनी चालत्या गाडीतून महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसकावून नेले. तर आजच सायंकाळी आष्टी शहरात दुचाकीवरून चैन स्नॅचिंगचा गंभीर प्रकार घडून महिला जखमी झाली.*

# अभिनेते धर्मेंद्र यांना मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्कार जाहीर


**नवी दिल्ली**

चित्रपट सृष्टीतले दिवंगत अभिनेते धर्मेंद्र यांना त्यांच्या कला क्षेत्रातील गौरवाबद्दल पद्म विभूषण या सन्मानाने गौरवण्यात आलं आहे. धर्मेंद्र यांना हा पुरस्कार मरणोत्तर दिला जाणार आहे. चित्रपटसृष्टीतील त्यांच्या योगदानाबाबत त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

धर्मेंद्र यांच्यासह शिबू सोरेन यांना राजकीय क्षेत्रातील योगदानासाठी मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. तर महाराष्ट्राचे माजी राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांना पद्म भूषण पुरस्कार देऊन गौरव केला जाणार आहे. त्याच प्रमाणे अलका याज्ञिक यांनाही पद्म भूषण पुरस्कार दिला जाणार आहे. तर



जाहिरात लेखक पियुष पांडे यांनाही मरणोत्तर पद्म भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.धर्मेंद्र. १९६० च्या दशकात तो आला. 'दिल भी तेरा हम भी तेरे', 'शोला और शबनम', 'अनपढ', 'शादी', 'बंदिनी', 'बेगाना', 'आयी मिलन की बेला', 'पुर्णिमा', 'फुल और पत्थर', 'देवर', 'अनुपमा', 'आये दिन बहार के' या सिनेमांमधून त्याच्या अभिनयाची जादू दाखवत राहिला. 'मेरा नाम जोकर'मधला त्याने साकारलेला सर्कसचा मालक आठवा. 'यादो की बारात' सिनेमातला शंकर आठवा. अजितच्या पायात ८ आणि ९ नंबरचा बूट पाहून चिडणारा. लहानपणी ताटातूट झालेल्या भावांची ओळख 'यादो की बारात निकली है आज' गाणारा शंकर, आपल्या भावांना, कुटुंबाला वाचवण्याची धडपड करणारा शंकर सगळ्यामध्ये धर्मेंद्र अगदी चपखल बसला आहे. 'ड्रीम गर्ल', 'सीता और गीता', ▶ उर्वरित पान २ वर












# माजलगावात सराफा व्यापाऱ्याचे ६० लाखाचे सोन्या चांदीचे दागिने लुटले

**माजलगाव । प्रतिनिधी**


व्यापार करण्यासाठी मोटरसायकलवरून खेडे गावाकडे जात असलेल्या सराफा व्यापाऱ्याला लुटल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. अज्ञात चोरट्यांनी व्यापाऱ्याच्या दुचाकीचा पाठलाग करत शस्त्राचा धाक दाखवत व्यापाऱ्याकडील ५० लाख रुपये किमतीचे साडेतीनशे ग्रॅम सोने तसेच दहा लाख रुपये किमतीतीची तीन किलो चांदी लुटली आहे. नेकनूरच्या आठवडी बाजारातून देखील ११ जानेवारी रोजी सराफा व्यापाऱ्याला लुटल्याची घटना घडली होती माजलगाव शहरातील हनुमान चौक येथे अमोल पंढरीनाथ गायके यांचे अमोल ▶ उर्वरित पान २ वर

# २६ जानेवारी – प्रजासत्ताक दिन : संविधानाचा दीप, स्वातंत्र्याचा अर्थ आणि नागरिकत्वाचा अभिमान

भारताच्या इतिहासात काही तारखा केवळ दिनदर्शिकेतील नोंदी नसतात ; त्या राष्ट्राच्या आत्म्यात कायमच्या कोरल्या जातात . २६ जानेवारी ही अशीच एक तारीख आहे . हा दिवस भारताने स्वतःला ओळख दिलेली , स्वतःचे शासनस्वरूप स्वीकारलेले आणि लोकसत्तेला घटनात्मक अधिष्ठान दिलेले आहे . प्रजासत्ताक दिन म्हणजे केवळ राष्ट्रीय सण नाही ; तो भारतीय लोकशाहीचा श्वास आहे , संविधानाचा उत्सव आहे आणि प्रत्येक नागरिकाच्या कर्तव्याची आठवण करून देणारा अभिमानाचा क्षण आहे .

स्वातंत्र्य मिळवणे ही ऐतिहासिक घटना होती ; पण स्वातंत्र्याला दिशा देणे , नियम देणे आणि मूल्यांची चौकट देणे हे त्याहून मोठे कार्य होते . १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला , पण २६ जानेवारी १९५० रोजी भारत खऱ्या अर्थाने स्वशासित झाला . त्या दिवशी भारताने स्वतःचे संविधान स्वीकारले आणि स्वतःला प्रजासत्ताक घोषित केले . सत्ता राजा , सम्राट किंवा वारसाहक्काकडे न ठेवता , ती थेट जनतेकडे सुपूर्द करण्यात आली . म्हणूनच प्रजासत्ताक दिन हा सरकारचा नाही , तर नागरिकांचा सण आहे .

२६ जानेवारी ही तारीख निवडण्यामागेही इतिहासाची खोल जाण आहे . २६ जानेवारी १९३० रोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने लाहोर अधिवेशनात पूर्ण स्वराज्याचा ठराव मंजूर केला होता . त्या दिवसापासून भारताने ब्रिटिश सत्तेखाली अर्धवट स्वातंत्र्य नाकारून संपूर्ण स्वराज्याचा संकल्प केला . म्हणूनच संविधान अंमलात आणण्यासाठी हाच दिवस निवडण्यात आला . हा निर्णय केवळ प्रशासकीय नव्हता ; तो स्वातंत्र्यलढ्याला दिलेला मान होता .




भारतीय संविधान हे एका दिवसात तयार झालेले नाही . जवळपास तीन वर्षे चाललेल्या चर्चांमधून , वादविवादांतून , अनुभवांतून आणि त्यागातून ते जन्माला आले . डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेले हे संविधान केवळ कायद्यांचा संग्रह नाही ; ते सामाजिक करार आहे . समानता , स्वातंत्र्य , न्याय आणि बंधुता या चार मूल्यांवर भारतीय लोकशाही उभी आहे . बाबासाहेबांनी स्पष्ट शब्दांत सांगितले होते की संविधान कितीही चांगले असले , तरी ते अंमलात आणणारे लोक चांगले नसतील , तर ते अपयशी ठरेल . म्हणूनच प्रजासत्ताक दिन हा आत्मपरीक्षणाचा दिवस आहे .

भारतीय संविधान जगातील इतर संविधानांपेक्षा अनेक अर्थांनी वेगळे आहे . हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे . इतक्या विविध भाषा , धर्म , जाती , संस्कृती आणि भौगोलिक विषमता असलेल्या देशात एकसमान नागरिकत्व देणारे हे दुर्मीळ उदाहरण आहे . धर्मनिरपेक्षता , सामाजिक न्याय , आरक्षण , मूलभूत अधिकार आणि मूलभूत कर्तव्ये यांचा समतोल साधणारे हे संविधान आहे . जिथे अनेक देशांत संविधान सत्तेचे रक्षण करते , तिथे भारतीय संविधान नागरिकाचे रक्षण करते . हीच त्याची खरी ताकद आहे .

प्रजासत्ताक दिन साजरा करताना त्या असंख्य बलिदानांची आठवण होणे अपरिहार्य आहे . लोकमान्य टिळक , महात्मा गांधी , सुभाषचंद्र बोस , भगतसिंग , राजगुरू , सुखदेव , चंद्रशेखर आझाद यांच्यासारख्या असंख्य क्रांतिकारकांनी आपले आयुष्य देशासाठी अर्पण केले . त्यांच्या त्यागामुळेच संविधानातील प्रत्येक शब्दाला नैतिक अधिष्ठान लाभले . दे दी हमें आज़ादी बिना खड्ग बिना ढाल या ओळी आजही स्वातंत्र्याच्या मूल्यांची आठवण करून देतात .

दिल्लीतील कर्तव्य पथावरील प्रजासत्ताक दिनाची परेड ही केवळ लष्करी शक्तीचे प्रदर्शन नाही . ती भारताच्या सांस्कृतिक विविधतेचा , वैज्ञानिक प्रगतीचा आणि सामाजिक एकतेचा आरसा आहे . राज्यांचे चित्ररथ अनेकतेत एकता या संकल्पनेला दृश्य रूप देतात . मराठी गाण्यातील देश माझा रंगीला , संस्कृतीचा संगम झाला ही ओळ या दिवसाला अधिक अर्थपूर्ण बनवते .

प्रजासत्ताक दिन आपल्याला अधिकारांची आठवण करून देतो ; पण त्याच वेळी कर्तव्यांचीही जाणीव करून देतो . मतदान करणे , कायदा पाळणे , सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे , सहिष्णुता जपणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे . मराठी म्हण आहे – अधिकार मागायचे असतील , तर कर्तव्ये पाळावी लागतात . लोकशाही ही केवळ निवडणूक प्रक्रिया नाही ; ती सतत चालणारी जबाबदारी आहे .

आजच्या काळात लोकशाहीसमोर नवी आव्हाने उभी आहेत . अफवा , द्वेष , असहिष्णुता आणि अर्धसत्य यामुळे लोकशाही कमजोर होऊ शकते . अशा वेळी संविधानातील मूल्ये अधिक घट्ट पकडणे गरजेचे आहे . लोकशाही टिकते ती भाषणांनी नाही ; ती टिकते कृतीतून , संयमातून आणि संवादातून .

भारत हा तरुणांचा देश आहे . आजची तरुण पिढीच उद्याचा भारत घडवणार आहे . संविधान समजलेली , विवेकशील आणि जबाबदार तरुणाईच प्रजासत्ताक मजबूत करू शकते . ये देश है वीर जवानों का ही ओळ आजही तितकीच अर्थपूर्ण आहे .

प्रजासत्ताक दिनाचा गर्व प्रत्येक भारतीयाला असावा , कारण हा देश आपला आहे , हे संविधान आपले आहे आणि ही लोकशाही आपली आहे . जगात अनेक देश स्वातंत्र्य मिळवतात ; पण फार थोडे देश लोकशाही टिकवतात . भारत हा त्यापैकी एक आहे . म्हणूनच २६ जानेवारी हा दिवस केवळ ध्वजारोहणाचा क्षण नाही ; तो नागरिक म्हणून स्वतःकडे पाहण्याचा क्षण आहे .

संविधान पुस्तकात नसते ; ते नागरिकांच्या आचरणात असते . आणि जेव्हा प्रत्येक नागरिक संविधान जगतो , तेव्हाच प्रजासत्ताक खऱ्या अर्थाने जिवंत राहते .

जय हिंद । जय संविधान ।

## रथसप्तमी आणि सूर्यनमस्कार : आरोग्य व ऊर्जेचा संगम



भारतीय संस्कृतीत रथसप्तमी हा सूर्योपासनेचा अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा दिवस मानला जातो. माघ महिन्यातील शुक्ल पक्षातील सप्तमीला साजरी होणारी रथसप्तमी ही सूर्यदेव उत्तरायणात पूर्णतः प्रवेश करतात, असे मानले जाते. या दिवशी सूर्यदेव आपल्या सात घोड्यांच्या रथातून आकाशमार्गे भ्रमण करतात, अशी पौराणिक श्रद्धा आहे. म्हणूनच हा दिवस आरोग्य, तेज आणि सकारात्मक ऊर्जेचा प्रतीक मानला जातो.याच पवित्र रथसप्तमीच्या निमित्ताने सूर्योपासनेचा एक महत्त्वाचा योगप्रकार असलेल्या सूर्यनमस्काराचे महत्त्व अधोरेखित करणे आवश्यक आहे.सूर्यनमस्कार ही भारतीय योगपरंपरेतील एक परिपूर्ण योगसाधना असून ती शरीर, मन आणि श्वास यांचा सुंदर समन्वय साधते. सूर्यनमस्कारामध्ये एकूण बारा आसनांचा समावेश असून प्रणामासन, हस्तउत्तानासन, पादहस्तासन, अश्वसंचालनासन, दंडासन, अष्टांग नमस्कार, भुजंगासन आणि पर्वतासन ही आसने लयबद्ध पद्धतीने केली जातात. म्हणून याला सर्वांगसुंदर व्यायाम असे देखील म्हणतात.या आसनांमुळे शरीरातील सर्व प्रमुख स्नायू, सांधे व अंतर्गत अवयव सक्रिय होतात. नियमित सूर्यनमस्कार केल्याने पचनसंस्था सुधारते, वजन नियंत्रणात राहते, रक्ताभिसरण सुरळीत होते तसेच मणक्याचा लवचिकपणा वाढतो. मानसिक ताणतणाव, चिंता व नैराश्य कमी होऊन मन शांत आणि एकाग्र बनते. रोगप्रतिकारशक्ती वाढणे आणि आत्मविश्वास वृद्धिंगत होणे हेही सूर्यनमस्काराचे महत्त्वाचे लाभ आहेत.सूर्यनमस्कार करताना काही काळजी घेणे आवश्यक आहे. शक्यतो सूर्यनमस्कार सकाळी सूर्योदयाच्या सुमारास आणि रिकाम्या पोटी करावा. आसने करताना श्वासोच्छ्वासाशी योग्य समन्वय ठेवावा. गर्भवती महिला तसेच कंबरदुखी, हर्निया, उच्च रक्तदाब किंवा इतर आजार असणाऱ्यांनी तज्ज्ञांचा सल्ला घेऊनच सूर्यनमस्कार करावा.रथसप्तमीच्या पवित्र दिवशी सूर्यनमस्काराची साधना केल्यास ती अधिक फलदायी ठरते. हा दिवस आपल्याला निरोगी शरीर, सकारात्मक विचार आणि ऊर्जायुक्त जीवन जगण्याची प्रेरणा देतो. म्हणूनच सूर्योपासनेसोबत सूर्यनमस्काराचा अंगीकार करणे ही काळाची गरज आहे.

**– डॉ. राधा सचिन तांबे, (आंतरराष्ट्रीय योग खेळाडू), संचालिका, राधिका अँडव्हान्स योग सेंटर बीड.**

◆ पान १ वरून पुढे...

## बीड बसस्थानकाच्या...

इमारतीची किंमत जवळ जवळ १० कोटीच्या रुपयाची असेल मात्र डिस्ट्रिक्ट इंजिनिअर व अधिकाऱ्यांना सोबतीला घेत कंपनीने गैरव्यवहार केल्याची खळबळ माहिती समोर येत आहे.स्थानिक नागरिकांच्या मते, मंजूर आराखड्याप्रमाणे काम न करता खर्च फु गवण्यात आला असून संबंधित ठेके दार आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने हा गैरव्यवहार झाल्याची शक्यता आहे. कामाच्या मोजमापात तफावत, सुरक्षा निकषांकडे दुर्लक्ष आणि दर्जा नियंत्रणाचा अभाव स्पष्ट दिसून येत आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, तसेच संपूर्ण कामाचे लेखापरीक्षण (ऑडिट) करावे, अशी मागणी नागरिक व सामाजिक संघटनांकडून होत आहे. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, एसटी प्रशासनाकडून या प्रकरणी अद्याप अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

## जुन्यांचे पगार...

गट सचिव म्हणून नियुक्ती देण्याचे आदेश दिले आहेत. कोणत्याही नियमात ही बाब बसत नसताना नियमाचे उल्लंघन करून या नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. बीड जिल्ह्यात यापूर्वी नव्वद गटसचिव काम करत होते. यातील फक्त बारा ते तेरा गट सचिवांना दरमहा पगार मिळत होता. तर अनेकांना कित्येक महिने पगार दिला जात नव्हता. त्याचप्रमाणे निवृत्त झालेल्या गट सचिवांची ग्रॅज्युएटी देखील देण्याची बँकेची परिस्थिती नाही. कित्तेकांची ग्रॅज्युइटी देणे बाकी आहे. अशी परिस्थिती असताना देखील कोणत्याही बाबीची पूर्तता होत नसताना जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था त्याचप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा संवर्ग गटसचिव सचिव संघटन यांनी चुकीचे आदेश दिले आहेत. यात जिल्हाधिकाऱ्यांना देखील ओढण्याचा प्रयत्न केला आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अत्यंत अडचणीत आहे. अधिकाऱ्यांबरोबर कर्मचाऱ्यांचे देखील पगार होऊ शकत नाहीत. ९० गट सचिवांपैकी बारा ते तेरा गट सचिवांचे पगार होतात. मात्र अशा परिस्थितीत संगनमताने हे आदेश काढून यातून आर्थिक मलिदा लाटण्याची देखील चर्चा मोठ्या प्रमाणात होत आहे. ही सर्व बाब गंभीर असून याची चौकशी झाली पाहिजे. दरम्यान राज्याचे सहकार मंत्री बीड मध्ये असल्याने त्यांनी या मुद्द्याची तात्काळ दखल घ्यावी, अशी मागणी देखील तक्रारदाराने केली आहे.

## प्रजासत्ताक दिन...

महाराष्ट्रातील लोकप्रिय तमाशा कलाकार रघुवीर खेडकर यांनादेखील पद्म पुरस्कार घोषित झाला आहे. कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे श्रीरंग देवबा लाड यांना पद्म पुरस्कार घोषित झाला आहे. तसेच प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. आर्मिडा फर्नांडिस यांनादेखील पद्म पुरस्काराने गौरवण्यात येणार आहेत.

भिकल्या लाडक्या धिंडा– भिकल्या लाडक्या धिंडा हे पालघर जिल्ह्यातील वलवंडे गावचे रहिवासी आहेत. ते ८९ वर्षीय आहेत. ते आदिवासी तारपा वादक आहेत. ते अतिशय उत्कृष्ट तारपावादन करतात. तसेच ते तारपाची निर्मिती देखील करतात. ते तरुणांना तारपावादन शिकवतात. तारपा हे बांबू आणि सुक्या भोपळ्यापासून बनवले जाणारे पारंपरिक वाद्य आहे. ते जवळपास ९ ते १० फूट लांबीचे असते. भिकल्या लडक्या धिंडा यांनी आपलं संपूर्ण आयुष्य आदिवासी संस्कृतीचे जतन आणि संवर्धनासाठी व्यथित केलं. त्यामुळे त्यांच्या कार्याचा गौरव आता सर्वोच्च पुरस्काराने करण्यात येणार आहे.

◆ पान १ वरून पुढे...

रघुवीर खेडकर – रघुवीर खेडकर हे प्रसिद्ध तमाशा कलावंत आहेत. ते गेल्या ४० ते ४५ वर्षांपासून तमाशा क्षेत्रात कार्यरत आहेत. तमाशा संस्कृती टिकवणं आणि ती राज्याबाहेर नेण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यामुळे त्यांना यावर्षी पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात येत आहे. रघुवीर खेडकर हे तमाशातील सोंगाड्या या भूमिकेसाठी लोकप्रिय आहेत. त्यांना त्यांच्या योगदानासाठी तमाशा महर्षी म्हणून देखील ओळखलं जातं. विशेष म्हणजे डॉ. जब्बार पटेल यांनी लिहिलेला 'एक होता विदूषक' हा चित्रपट रघुनाथ खेडकर यांना डोळ्यांसमोर ठेवून बनवण्यात आल्याचं मानलं जात. रघुवीर खेडकर हे मूळच्या अहिल्यानगर जिल्ह्याचे आहेत. प्रसिद्ध तमाशा सम्राज्ञी कांताबाई सातारकर यांचे ते पुत्र आहेत. रंगभूमीची सेवा करण्याचा वारसा रघुवीर खेडकर यांना आईपासून मिळाला. हा वारसा त्यांनी समर्थपणे जपला देखील आहे. त्यांच्या नेतृत्वातील तमाशा मंडळ रघुवीर खेडकर तमाशा मंडळ हे लोकप्रिय आहे.

श्रीरंग देवबा लाड – परभणी जिल्ह्यातील माळसोन्नाचे श्रीरंग देवबा लाड यांना कृषी क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानासाठी त्यांना पद्म पुरस्कार जाहीर झाला आहे. ते कापूस तंत्रज्ञानाचे जनक मानले जातात. तसेच शेतकरी–केंद्रीत कृषी नवप्रवर्तनाचे प्रेरक, स्वदेशी पशुधन संवर्धनाचे आदर्श मार्गदर्शक, ग्रामीण विकास, शाश्वत शेती यासाठी त्यांचं मोठं योगदान आहे. त्यांचं सामाजिक कार्यदेखील तितकेच मोठं देखील आहे. त्यांना याआधी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाकडून डॉक्टर ऑफ सायन्स (मानद) पदवी प्रदान करण्यात आली आहे. यासोबतच अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आलं आहे.

डॉ. आर्मिडा फर्नांडीस कोण आहेत? डॉ. आर्मिडा फर्नांडीस यांचं देखील समाजासाठी मोठं योगदान आहे. आर्मिडा या मुंबईतील प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ आणि नवजात शिशुतज्ज्ञ आहेत. भारतीय नवजात शिशु आरोग्य सेवेत त्यांचं खूप मोठं योगदान आहे. त्यांनी १९८९ मध्ये आशिया खंडातील पहिली दूध बँकेची स्थापना केली होती. नवजात शिशु मृत्यू दर कमी करण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. त्यामध्ये त्यांना यश देखील आलं. त्यांनी मुंबईतील शीव रुग्णालयात २५ वर्षांपेक्षा जास्त काळ बालरोग विभाग प्रमुख आणि डीन म्हणून काम केले आहे. यासोबतच २००० पेक्षा जास्त परिचारिका आणि डॉक्टरांना प्रशिक्षण दिलं आहे.

विशेष म्हणजे निवृत्तीनंतर त्यांनी स्नेहा संस्थेची स्थापना केली. ही संस्था मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये वास्तव्यास असणाऱ्या महिला आणि मुलांच्या आरोग्यासाठी काम करते. त्यांच्या आरोग्य क्षेत्रातील या अफाट योगदानासाठी त्यांना केंद्र सरकारकडून सर्वोच्च मानला जाणाऱ्या पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे.

या' दिग्गजांना जाहीर झाले पद्म पुरस्कार, वाचा संपूर्ण यादी

भगवानदास रायकर (मध्य प्रदेश), भिकल्या लाडक्या धिंडा (महाराष्ट्र), ब्रिजलाल भट्ट (जम्मू आणि काश्मीर), चरण हेमब्रम (ओडिशा), चिरंजी लाल यादव (उत्तर प्रदेश), डॉ. पद्मा गुरमेट (जम्मू आणि काश्मीर), कोल्लक्काइल देवकी अम्मा जी (केरळ), महेंद्र कुमार मिश्रा (ओडिशा), नरेश चंद्र देव वर्मा (त्रिपुरा), ओथुवर तिरुथनी (तामिळनाडू), रघुपत सिंग (उत्तर प्रदेश), रघुवीर खेडकर (महाराष्ट्र), राजस्थानपती कलिअप्पा गौंडर (तामिळनाडू), सांग्युसांग एस. पोंगेनर (नागालँड), श्रीरंग देवबा लाड (महाराष्ट्र), तिरुवरूर बख्तवासलम (तामिळनाडू), अंके गौडा (कर्नाटक), डॉ. आर्मिडा फर्नांडिस (महाराष्ट्र), डॉ. श्याम सुंदर (उत्तर प्रदेश), गफ्फारुद्दीन मेवाती (राजस्थान), खेम राज सुंदरियाल (हरियाणा), मीर हाजीभाई कासंबाई (गुजरात), मोहन नगर (मध्य प्रदेश), नीलेश मांडलेवाला (गुजरात), आर अँड एस गोडबोले (छत्तीसगड), राम

◆ पान १ वरून पुढे...

रेड्डी मामिदी (तेलंगणा), सिमांचल पात्रो (ओडिशा), सुरेश हनगवाडी (कर्नाटक), तेची गुबिन (अरुणाचल प्रदेश), युनाम जात्रा सिंग (मणिपूर), बुधरी थाठी (छत्तीसगड) , डॉ. कुमारसामी थंगराज (तेलंगणा), डॉ. पुननियामूर्ती नटेसन (तामिळनाडू), हेले वॉर (मेघालय), इंद्रजित सिंग सिद्धू (चंदीगड), के. पंजनिवेल (पुडुचेरी), कैलास चंद्र पंत (मध्य प्रदेश), नुरुद्दीन अहमद (आसाम), पोकिला लेकटेपी (आसाम), आर. कृष्णन (तामिळनाडू), एस जी सुशीलम्मा (कर्नाटक), तागा राम भील (राजस्थान), विश्व बंधू (बिहार), धर्मिकलाल चुनीलाल पंड्या (गुजरात), शफी शौक (जम्मू आणि काश्मीर).

## अभिनेते धर्मेंद्र....

'चुपके चुपके' या सिनेमातल्या त्याच्या भूमिकाही खास गाजल्या. अमिताभ बच्चन, धर्मेंद्र, जया भादुरी, शर्मिला टागोर, ओमप्रकाश अशी तगडी स्टार कास्ट असलेल्या 'चुपके चुपके' सिनेमात धर्मेंद्रने त्याच्यात विनोदी अभिनेताही लपला आहे हे दाखवून दिलं. ऋषिकेश मुखर्जींचं दिग्दर्शन आणि इतक्या सगळ्या कलाकारांची फौज यात ओम प्रकाशची जिरवताना 'प्यारे मोहन' बनून त्याने जी काही धमाल केली आहे ती केवळ अविस्मरणीय. त्यांच्या या सगळ्या योगदानाचा गौरव भारत सरकारने केला आहे. त्यांना पद्म विभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. २०१२ मध्ये सिनेसृष्टीतल्या कारकिर्दीबाबत पद्म भूषण पुरस्कार देऊन त्यांना गौरवण्यात आलं. मात्र फिल्मफेअर किंवा अगदी सहाय्यक अभिनेता म्हणूनही त्याला पुरस्कार मिळाला नाही. आता त्यांना मरणोत्तर पद्म विभूषण या पुरस्काराने गौरवण्यात आलं आहे.

## माजलगावात सराफा....

ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. आज सकाळी ९ वाजता अमोल गायके माजलगाव शहरातून व्यवसाय करण्यासाठी मोटारसायकलवरून खेडेगावला जात होते. तालखेड फाट्याजवळ त्यांची मोटारसायकल आली असता पाठीमागून अज्ञात चोरटे चार चाकी वाहनातून त्याचा पाठलाग करत आले.यावेळी त्यांनी सराफा व्यापाऱ्याच्या मोटरसायकलच्या समोर गाडी लावून कोयता, शस्त्राचा धाक दाखवला. जीवे मारण्याची धमकी दिली. व्यापाऱ्याच्या हातातील सोन्या चांदीची बॅग हिसकावली. ज्यात साडेतीनशे ग्रॅम सोन्याचे दागिने होते. ज्याची अंदाजे किंमत ५० लाख रुपये तर तीन किलो चांदीचे दागिने ज्याचे अंदाजे किंमत १० लाख रुपये असल्याची माहिती आहे.अज्ञात चोरट्यांनी लागलीच घटनास्थळावरून पलायन केले. दिवसाढवळ्या घडलेल्या या रोड रॉबरीच्या (दरोडा) घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.नेकनूरच्या आठवडी बाजारातून ११ जानेवारी रोजी सराफा व्यापाऱ्याची १५ किलो चांदी असलेली पेटीसह ५० हजार रुपयांची रोकड डल्ला मारून चोर घेऊन गेला असल्याची घटना घडली होती.

## बीड की बिहार...

सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. व्हिडीओत चारही आरोपी एकाच व्यक्तीवर अमानुषपणे हल्ला करताना स्पष्टपणे दिसत आहेत. या प्रकरणी रोहित गायकवाड, शुभम लोंढे, आसिफ शेख आणि साहिल पठाण या चार जणांविरोधात शिरूर कासार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मारहाणीचे कारण मात्र अद्याप अस्पष्ट आहे. याचा अधिक तपास शिरूर कासार पोलिस करत आहेत.

◆ पान ४ वरून पुढे...

## बीडमध्ये राष्ट्रध्वजाचा....

केली आहे. कायदेशीर कारवाईची मागणी: 'भारतीय ध्वज संहिता' आणि 'राष्ट्रीय गौरव अपमान निवारण अधिनियम, १९७१ नुसार फाटलेला किंवा मळलेला ध्वज फडकवणे हा गुन्हा आहे. यापूर्वी तोंडी तक्रार करूनही कोणतीही कारवाई न झाल्याने, आता लेखी पत्राद्वारे समीर गुलाम नबी काझी यांच्यावर गुन्हा नोंदवण्याची मागणी करण्यात आली आहे. या पत्राची प्रत शिवाजी नगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांनाही माहितीसाठी देण्यात आली आहे. या गंभीर विषयावर आता पोलीस प्रशासन काय पाऊल उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जिथे शिक्षणाचे...

आढावा घेत विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.अर्जुन राठोड, प्रा.राम गायकवाड, प्रा.भारत मगर,प्रा.प्रदीप गाडे, आयु.दीपा रोडे, प्रा.अकांक्षा सोनवणे,

◆ पान ४ वरून पुढे...

प्रा.शिवराम शिवगिरे आदी मान्यवर उपस्थित होते. उपशिक्षणाधिकारी सोनवणे यांनी आपल्या मार्गदर्शनात प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीचा दाखला देत विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा मंत्र सांगितला. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात काकदृष्टी, बकध्यानम्, श्वाननिद्रा, अल्पभोजी व गृहत्यागी ही पाच लक्षणे अंगीकारली पाहिजेत. ही मूल्ये विद्यार्थ्याला शिस्तबद्ध बनवून मातृभूमीच्या सेवेसाठी सदैव तत्पर ठेवतात, असे त्यांनी नमूद केले. स्नेहसंमेलनात शाळेच्या चिमुकल्यांपासून ते माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सरस सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. देशभक्तीपर गीते, कोळीगीते, लावणी तसेच आदिवासी नृत्य सादरीकरणांनी कार्यक्रमात विशेष रंगत आणली. पारंपरिक व विविध वेशभूषांमधून विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचे प्रभावी दर्शन घडवले. आपल्या पाल्यांना रंगमंचावर कला सादर करताना पाहून पालकांच्या चेहऱ्यावर समाधान ओसंडून वाहत होते. सौभाग्य लॉन्सचा परिसर विद्यार्थ्यांच्या जयघोषाने व टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेला. शाळेच्या प्राचार्या उमा जगतकर व संपूर्ण शिक्षक–शिक्षकेतर

◆ पान ४ वरून पुढे...

कर्मचाऱ्यांच्या शिस्तबद्ध नियोजनामुळे हा सोहळा अत्यंत यशस्वी ठरला. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन करून राष्ट्रगीताने या अविस्मरणीय सोहळ्याची सांगता करण्यात आली.

## अपघातग्रस्त तरुणाला....

अनेकांचे प्राण वाचू शकतात, अशी भावना व्यक्त केली. या सत्कारामुळे प्रेरणा मिळाली असून नागरिकांनी भविष्यातही कोठेही अपघात झालेला असल्यास क्षणाचाही विलंब न करता अपघातग्रस्तांना मदत केली पाहिजे असे बाजीराव ढाकणे यांनी म्हटले आहे. तसेच आपण करत असलेलं सामाजिक कार्य म्हणजे संकटात सापडलेल्या माणसाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करणे हेच असते ते काम निरंतर चालू ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी काँग्रेसचे बीड शहराध्यक्ष तथा उद्योजक परवेझ कुरेशी, नगरसेवक झक्कीउदिन मोमिन, किसान सभेचे सरचिटणीस ज्योतीराम हुरकुडे, सामाजिक कार्यकर्त्या आम्रपाली साबळे, डॉ साक्षी जोगदंड, ॲड अनिल बारगजे, ॲड नितीन वाघमारे, बीड शहर

◆ पान ४ वरून पुढे...

बचाव मंचाचे नितीन जायभाये, आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष फौजी अशोकराव येडे, साप्ताहिक संघर्षयात्रा चे संपादक आत्माराम वाव्हळ, पत्रकार संजय कुलकर्णी, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस भाऊराव प्रभाळे, डोळस, इत्यादी मान्यवर मंडळींची उपस्थिती होती.

## 'मोरांना अभय द्या'...

मुळे जोशी परिवाराचे अभिनंदन केले. या प्रसंगी श्री. बाळासाहेब जोशी, श्री. नितीन जोशी, श्री. नरेंद्र जोशी, श्री. निलेश जोशी, कु. शिंपली जोशी, कु. मुग्धा जोशी, चि. अन्वय जोशी यांनी संकल्पना उभारणीसाठी सहाय्य केले. जोशी कुटुंबीय प्रतिवर्षी खेड्याकडे चला, गोसंवर्धन, अवयवदान, प्रेमाला उपमा नाही अश्या नावीन्यपूर्ण सामाजिक संकल्पना घेऊन समाज जागृतीचे कार्य करते. विशेष बाब म्हणजे जोशी परिवाराने एकत्रित येऊन या संकल्पनेचे आयोजन करून मयूर संकल्पना व मयूर संवर्धनाचा सामाजिक संदेश दिल्याबद्दल सर्व मित्र परिवार, आप्तेष्ट, नातेवाईक, विठ्ठल नगर परिसरातील नागरिकांनी जोशी परिवाराचे अभिनंदन केले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# जि .प व प. स च्या निवडणुका जिंकण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागावे : जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप

## सांडस चिंचोली येथे शिवसेनेची शाखा स्थापन

**माजलगाव । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका जिंकण्यासाठीच शिवसैनिकांनी कामाला लागावे असे आव्हान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी केले आहे.



तालुक्यातील सांडस चिंचोली येथे शिवसेना उपतालुकाप्रमुख माऊली कदम यांनी शिवसेनेची शाखा उद्घाटन चे आयोजन दिनांक २४ जानेवारी शनिवार रोजी सायंकाळी सात वाजता मोठ्या उत्साहात करण्यात आले या वेळी उद्घाटक म्हणून जगताप बोलत होते.

कार्यक्रमास किसान सेनेचे जिल्हाप्रमुख एडवोकेट बापूसाहेब जाधव शिवसेना बीड तालुकाप्रमुख संतोष जाधव शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले शिवसेना शहरप्रमुख धनंजय पापा सोळंके उपजिल्हाप्रमुख नितीन मुंदडा युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे धोंडीराम जाधव आधी उपस्थित होते

यावेळी पुढे बोलताना जगताप म्हणाले की अखंड हिंदुस्तानाचे हिंदुरुदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार आणि यांचा विचाराचा वारसा शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब संसद रत्न खासदार श्रीकांत शिंदे साहेब चालवत आहेत त्यांनी सर्वसामान्य माणसाला समोर ठेवून शासनाच्या विविध योजना ंचा लाभ सामान्य माणसाला मिळाला पाहिजे यासाठी ते रात्रंदिवस काम करत आहे आणि शासनाने या तीन वर्षाच्या कार्यकाळामध्ये ज्या योजना राबवल्या आहेत त्या योजनेचा लेखाजोखा जनतेसमोर घेऊन जाण्याचे काम शिवसैनिकांना करावे लागणार आहे आणि आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका जिंकण्यासाठीच शिवसैनिकांनी कामाला लागावे असे भावनिक आव्हान अनिल दादा जगताप यांनी केले आहे. यावेळी अँड बापूसाहेब जाधव तुकाराम येवले धनंजय पापा सोळंके यांचेही समायोजित भाषणे झाली. यावेळी शिवसेना शाखाप्रमुख सचिन कदम उपशाखाप्रमुख महादेव बादाडे सचिव बापू शेजुळ सहसचिव गणेश काळे कोषाध्यक्ष कैलास शिंदे सदस्य संभाजी कदम गणेश काटवटे शंकर भोसले रवींद्र कदम अमर कदम करण कदम लक्ष्मण भोसले काकागिरी सुंदर पवार ओम कदम नितीन चौधरी आदी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# ढगाळ वातावरण पिकांच्या 'मुळावर'

## कांदा, गहू, लसूण,आंबे ,चारा पिके रोगांच्या विळख्यात ; बळिराजांच्या अडचणीत वाढ ; उत्पन्न घटण्याची भीती

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे खरीप हंगाम वाया गेला, तर गेल्या दोन दिवसांपासून ढगाळ हवामानामुळे रब्बी पिकेही विविध रोगाच्या विळख्यात सापडली आहेत. उत्पादनखर्च वाढणार असून, उत्पन्न मात्र घटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. अतिवृष्टीमुळे सर्वत्र पाण्याची उपलब्धता असल्याने सुमारे १० हजार हेक्टर क्षेत्रावर रब्बी पिके डोलावत होती. अनुकूल वातावरण व मुबलक पाणी यामुळे सर्वच रब्बी हंगामातील पिके मोठ्या जोमात होती, मागील महिन्यात वातावरणात अचानक बदल झाला होता. वाढलेले धुके व ढगाळ हवामानामुळे पिकांना विविध रोगांनी ग्रासले होते. जोमात असलेली पिके रोगांच्या विळख्यात सापडल्याने बळिराजा चिंतेत पडला होता. महागड्या औषधांची फवारणी व खतांचा वापर करून मागील महिन्यात पडलेल्या रोगांमधून पिकांना कसेबसे वाचवले गेले होते. परंतु गेल्या दोन दिवसांपासून बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात ढगाळ वातावरण तयार झाल्याने शेतकऱ्यासमोर नवे संकट उभे राहिलेआहे. परिसरात सर्वदूर अतिवृष्टी झाल्याने सर्व तलाव, बंधारे, नाले तुडुंब भरले होते. खरीप हंगाम अतिवृष्टीने वाया गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला होता. खरीप हंगामाची भरपाई रब्बी हंगामात होईल या अपेक्षेवर शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने रब्बी पिकांची पेरणी व कांदा लागवड मोठ्या प्रमाणात केली होती. लाल कांद्याच्या सीझनमध्ये भाव गडगडलेले होते. त्यातच अतिवृष्टीमुळे लाल कांदा उत्पादनात मोठी घट होणार असल्याचे चित्र दिसून येत असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी लाल कांद्याच्या उभ्या पिकात नांगर फिरवला. परंतु गावरान कांदा, गहू, हरभरा, लसूण, चारा पिकेमोठ्या प्रमाणात घेण्यात आली.

रब्बी हंगामात ज्वारी, हरभरा व गव्हाच्या क्षेत्रात वाढ झाली आहे. त्याचबरोबर गावरान कांद्याची लागवडही मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहे. गुलाबी थंडी व पोषक वातावरणामुळे रब्बी हंगामातील सर्वच पिके मोठ्या जोमात होती. परंतु ढगाळ हवामानाचा फटका सर्वच पिकांना बसला असून, विविध रोगांनी ग्रासले आहे.

पिकांवर पडलेले रोग!- गहु: मावा, तांबेरा, ज्वारी चिकटा, मावा, हरभरा घाटी अळी, मर: कांदा / लसूण: मावा, तुडतुडे, मर, करपा, डाऊनी, मका: अमेरिकन लष्करी अळी, भाजीपाला टोमॅटो अळी, डाऊनी, भेंडी नागअळी, लाल कोळी, तसेच अळीचा प्रादुर्भाव, कोथिंबीर भुरीचा प्रादुर्भाव, वांगे : अळीचा प्रादुर्भाव, मेथी मावा, कोबी/फ्लॉवर अळीचा प्रादुर्भाव, ढगाळ हवामानामुळे पिकांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे. शेतकऱ्यांनी पाण्याचे योग्य व्यवस्थापन, तसेच कृषितज्ज्ञांच्या सल्ल्याने उच्च दर्जाची कीटकनाशके, बुरशीनाशक औषधांची फवारणी करावी. -भगवान जाधव कृषी सेवा केंद्र संचालक पिंपळनेर

# भारत सातपुते यांच्या ‘जागरण’ आत्मचरित्राला कराडचा राज्यस्तरीय मुकादम साहित्य पुरस्कार जाहीर

## जागरणचा रत्नागिरी, नांदेड ,नागपूर येथेही सन्मान होणार!

**कराड । प्रतिनिधी**

लातूर येथील ज्येष्ठ साहित्यिक भारत सातपुते यांच्या ‘जागरण’ या कादंबरीवजा आत्मचरित्राला कराड येथील राज्यस्तरीय मुकादम साहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. रयत शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष व या पंचक्रोशीतील लोकप्रिय आसे दानशूर विश्वस्त कै. बंडो गोपाळा कदम उर्फ मुकादम तात्या यांच्या नावे गेल्या ४४ वर्षापासून दरवर्षी महाराष्ट्रातील एका उत्कृष्ट ग्रंथास अतिशय सन्मानपूर्वक व भव्यदिव्य सोहळ्यात हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी हा पुरस्कार भारत सातपुते यांच्या जागरणला जाहीर झाल्याचे अध्यक्ष एस.के. कुंभार व सचिव व्हि.आर. सुतार यांनी कळविले आहे. कराड येथे



संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंके तर प्रमुख पाहुणे म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्राचार्य डॉ . ज्ञानदेव मस्के, प्राचार्य डॉ. मोहनराव राजमाने , प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

रयत शिक्षण संस्थेचे सदगुरू गाडगे महाराज विद्यालय व पांडुरंग देसाई अध्यापक विद्यालयातील हजारो माजी विद्यार्थ्यां एकत्रित येऊन दरवर्षी २९ जानेवारीला हा कार्यक्रम आयोजित करतात. स्मृतीचिन्ह, गौरवपत्र,रोख रक्कम, प्रवास खर्च देऊन हा सन्मान केला जातो. भारत सातपुते यांच्या जागरणला या दीड वर्षात लाभलेला हा २८ वा पुरस्कार आहे. शैक्षणिक, सामाजिक व साहित्यिक कार्याबद्दल तसे भारत सातपुते यांनी पुरस्कारांचे शतक केंव्हाच पार केले आहे. यापूर्वी राज्यभरातून हा सन्मान लक्ष्मण माने, शंकरराव खरात ,सिंधुताई सपकाळ, दया पवार, पार्थ पोळके, उत्तम बंडू तुपे, राजन गवस, आप्पासाहेब खोत, नरेंद्र जाधव, उत्तम कांबळे, श्रीपाल सबनीस,किशोर काळे, विश्वास पाटील आ.ह. साळुंखे, द.ता. भोसले ,वामन होवाळ, नागनाथ कोत्तापल्ले , प्र.ई. सोनकांबळे, लक्ष्मण गायकवाड ,शरणकुमार लिंबाळे माधव कोंडविलकर यांना लाभला असून हा पुरस्कार आता यावर्षी लातूरचे भारत सातपुते यांना जाहीर झाला आहे. या महिनाभरात जागरणचे आणखी तीन सन्मान होणार असून अक्षरोदय साहित्य मंडळ व मातोश्री भागाबाई विठ्ठलराव डोंगरे प्रतिष्ठान यांच्या वतीनेही भारत सातपुते यांच्या जागरणला राज्यस्तरीय साहित्यरत्न पुरस्कार जाहीर झाला असून तो एक फेब्रुवारीला नांदेड येथे संपन्न होणार असल्याचे कार्याध्यक्ष सदानंद सपकाळे व सचिव नागोराव डोंगरे यांनी कळविले आहे. यानिमित्त संपन्न होणाऱ्या साहित्यसंमेलनात कवीसंमेलनाचे सूत्रसंचालनही भारत सातपुते करणार आहेत तसेच रत्नागिरीच्या माहेर या सामाजिक संस्थेचाही जागरणला पाच फेब्रुवारीला पुरस्कार प्रदान करणार असल्याची माहिती प्रकल्प सुनील कांबळे यांनी कळवले आहे व नागपूरच्या पद्मगंधा साहित्य प्रतिष्ठाचा जागरणला एक मार्चला पुरस्कार दिला जाणार आहे.

# रस्ता सुरक्षा अभियानातून विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांची जाणीव : यशवंत विद्यालयात विविध स्पर्धांचा उत्साह

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील यशवंत विद्यालय, बीड येथे दि. २५ जानेवारी २०२६ रोजी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर व उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा वाहतूक शाखाप्रमुख सुभाष सानप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी यशवंत विद्यालयाचे माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक गणेश



वाघ, सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे, लेक लाडकी अभियानाचे जिल्हाप्रमुख बाजीराव ढाकणे, समुपदेशक मनीषा बिक्कड, पी.एस.आय. विजय जाधवर, पोलीस हवालदार आजिनाथ मुंडे, सखाराम घोलप, राजाभाऊ तांदळे, शुभम सानप, संतोष काटकर, नारायण वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.मार्गदर्शन करताना सुभाष सानप यांनी वाहतूक नियमांचे पालन करणे जीवनरक्षक ठरते, असे प्रतिपादन केले. विद्यार्थीदशेपासूनच वाहतूक नियमांची सवय लावणे आवश्यक असून पायी चालताना तसेच सायकल चालवतानाही नियमांचे पालन करावे, असे त्यांनी सांगितले. अपघात होण्यामागील विविध कारणांची सविस्तर माहिती देत त्यांनी विद्यार्थ्यांना सतर्क राहण्याचे आवाहन केले.मुख्याध्यापक गणेश वाघ यांनी सांगितले की, देशातील सर्वाधिक वाहतूक रस्ते मार्गाने होते. त्यामुळे रस्ते वाहतूक नियमांविषयी जनजागृती होणे अत्यंत गरजेचे आहे. प्रत्येक नागरिकाने नियमांचे काटेकोर पालन केल्यास अपघातांचे प्रमाण निश्चितच कमी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या उपक्रमांतर्गत निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा तसेच घोषवाक्य स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशवंत विद्यालयाचे शिक्षक गाडेकर के. बी. यांनी केले. स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी शिक्षक शेळके एम. बी., गीते एस. जी., गायकवाड पी. पी., घुगे एन. एस. सेवक, नवनाथ धुरंदरे यांनी विशेष परिश्रम घेतले.या मार्गदर्शनपर कार्यक्रमास विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक, माता-पिता व पालक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुन्हेगारांचे कर्दनकाळ ठरलेले पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांना पत्रकार संघाचा महाराष्ट्राचे राजरत्न हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारांचे खऱ्या अर्थाने कर्दनकाळ ठरलेले पहिले पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने महाराष्ट्राचे राजरत्न - २०२६ हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. पोलीस प्रशासनामध्ये सन २०१७ मध्ये देशसेवेचे स्वप्न उराशी घेऊन नवनीत कॉवत हे लोणावळा येथे एसडीपीओ म्हणून रुजू झाले. मेहनत आणि संघर्ष यावर ते धाराशिवचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक झाले. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथे पोलीस उपायुक्त म्हणून त्यांनी कार्य केले. बीड जिल्हा संवेदनशील टप्प्यावर असताना २१ डिसेंबर २०२४ पासून त्यांनी पोलीस अधीक्षक पदाचा पदभार स्वीकारला. अवघ्या एक वर्षाच्या कालावधीत त्यांनी बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी मोडीत काढली असून बीड जिल्ह्यातील जातीय द्वेष आणि अशांतता दूर करत पुन्हा एकदा बीड जिल्ह्यामध्ये सामाजिक सलोखा उभा



करण्याचे अवघड काम त्यांनी लिलयारित्या पार पाडले आहे. आई शिक्षिका आणि वडील भारतीय रेल्वेतून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांच्या आदर्श विचारांवर त्यांनी सुरू केलेले प्रशासकीय कामकाज उल्लेखनीय आणि प्रशसनीय आहे. याकरिताच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने महाराष्ट्राचे राजरत्न - २०२६ हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला असल्याचे पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी आणि महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा

# बीड आगारात ‘चालक दिन’ उत्साहात साजरा; उत्कृष्ट व अपघातमुक्त चालकांचा गौरव



**बीड । प्रतिनिधी**

बीड आगारात शुक्रवार, दिनांक २४ जानेवारी २०२० रोजी चालक दिन मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कांडगिरे मॅडम (यंत्र अभियंता, चालन विभागीय कार्यशाळा, बीड) होत्या.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रादेशिक कार्यालयाचे परिवहन अधिकारी, तसेच बीड वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक जाधवर साहेब उपस्थित होते. यावेळी आगारप्रमुख सतीश तिडके, स्थानक प्रमुख भीम किरण बनसोडे, कार्यशाळा अधीक्षक गणेश सोनार, वाहतूक निरीक्षक सौ. ज्योती नागरगोजे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक शिशिरकुमार वाघमारे, यादव साहेब आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी तसेच अपघातमुक्त सेवा देणाऱ्या चालकांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये चालक ढाकणे, नागरगोजे, कोरडे, मधुकर सानप, संतोष कांबळे, राजू शेख, घरत आदी चालकांचा समावेश होता. यावेळी प्रादेशिक परिवहन अधिकारी जावळे साहेब यांनी चालक व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच पोलीस उपनिरीक्षक जाधवर यांनी वाहतुकीचे नियम, शिस्त आणि चालक हा देशाच्या दळणवळण व्यवस्थेचा कणा असल्याचे महत्त्व पटवून दिले.अध्यक्षीय भाषणात यंत्र अभियंता कांडगिरे मॅडम यांनी एसटी चालकाचे महामंडळातील अनन्यसाधारण महत्त्व स्पष्ट करत, जानेवारी महिन्यात चालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली व सर्व चालक व कर्मचाऱ्यांना चालक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ससाने सुरेश (लिपिक, बीड आगार) यांनी केले, तर आभार प्रदर्शन आगारप्रमुख खिडके साहेब यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वरिष्ठ लिपिक दिसले सर, सचिन होले, चंदू दराडे यांनी विशेष सहकार्य केले. या कार्यक्रमास बीड आगारातील सर्व चालक, वाहक, यांत्रिक कर्मचारी तसेच अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय सेवा योजना शिबीर म्हणजे श्रम संस्काराचे उत्तम माध्यम आहे : डॉ. योगेश क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रीय सेवा योजना शिबीर म्हणजे श्रम संस्काराचे उत्तम माध्यम आहे. शिबीरार्थी स्वयंसेवकांना श्रमाचे प्रात्यक्षीक शिबीरातून होत असते. शहरी जीवन आणि ग्रामिण जीवन यातील फरक त्यांना कळतो. भावी आयुष्याची वाटचाल कशी करावी याबद्दलची जाणीव शिबीरातून होत असते. आजचे हे विद्यार्थी स्वयंसेवक उद्याचे देशाचे सक्षम नागरीक होणार आहेत. त्यांच्या शक्तीला व क्षमतेला योग्य वळण देण्याचे हे वय असून समाजाप्रती सेवेची भावना देशप्रेमाची भावना या शिबीरातून निर्माण होते. शिबीरामध्ये प्रबोधनासहीत विविध समाजिक उपक्रम राबवले जातात. त्यामागचा मुख्य उद्देश आजची तरुण पिढी सर्वांगाने सक्षम करणे हाच आहे. शिबीरामध्ये वेगवेगळया विषयावर प्रबोधन होत असते. त्यासाठी विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींना व्याख्यानासाठी आमंत्रित केले जाते. म्हणून राष्ट्रीय सेवा योजना शिबीरात सहभाग



घेणे ही सुवर्णसंधी असते. असे प्रतिपादन नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर यांनी सौ. के.एस.के. महाविद्यालय बीड आयोजित मौजे काकडहिरा येथील सात दिवशीय निवासी राष्ट्रीय सेवा योजना शिबीराच्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी मौजे काकडहिरा गावचे सरपंच सौ. प्रिती अमोल बागलाने म्हणाल्या की, शिबीरार्थी स्वयंसेवाकांनी आमच्या गावात तीनशेहून अधिक झाडांची लागवड केली आहे. हे कार्य कौतुकास्पद असून गाव स्वच्छतेचेही काम शिबीरार्थींनी मोठया प्रमाणात केले आहे. या समारोपाच्या कार्याक्रमास संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे हे अध्यक्ष म्हणून लाभले होते. ते अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, शिबीरार्थी स्वयंसेवकांना सात दिवसात उत्तम संस्कार देण्याचे काम करण्यात आले असून श्रम आणि संस्काराची शिदोरी स्वयंसेवकांना त्यांच्या आयुष्यात नक्की कामाला येईल. या कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांचीही उपस्थिती होती. मौजे काकडहिरा गावचे सामाजिक कार्यकर्ते श्री अमोल बागलाने, कार्यक्रमाधिकारी डॉ. यादव घोडके, प्रा. जयंत साठे, डॉ. सय्यद इमादोद्दि, डॉ. प्रमोद गायके, डॉ. पल्लवी इरलापल्ले, डॉ. प्रियंका नवले, डॉ. ज्ञानेश्वर घोडके, डॉ. आघाव सर, डॉ. संजय काळे

# सौ.के.एस.के.महाविद्यालयात सोनाजीराव क्षीरसागर आंतर महाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धा संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

येथील सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात गेली ४९ वर्षे अविरतपणे होणारी सोनाजीराव क्षीरसागर अंतमहाविद्यालयीन वाद विवाद स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे यांच्या हस्ते झाले. त्यांनी लोकनेत्या काकू व नाना यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकताना नवगण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून बीड जिल्हयात ऊसतोड काम करणार्या कामगारांच्या मुलांसाठी शिक्षण संस्थेच्या वतीने सामान्य लोकांपर्यंत शिक्षणाचे दारे उभी करुन सामान्य मुलांना रोजगाराची संधी प्राप्त करुन दिली. त्यासाठी गेल्या ५५ वर्षांपासून अविरतपणे सामान्य माणसाला शिक्षणाची सोय केली आहे. या निमित्ताने परीक्षक प्रा. बापुसाहेब शिंदे यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस व शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त जीवन व कार्याचा परिचय करुन दिला. या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी महाविद्यालयाच्या वतीने संपन्न होत असलेल्या आंतरमहाविद्यालयीन वाद - विवाद स्पर्धे विषयीची पार्श्वभुमी विशद केली. अशा स्पर्धेमुळे चांगले संस्कार व भावनाची देवाण घेवाण होते. नविन पिढी सोशियल मेडियाच्या वापरामुळे गुंतत चाललेली आहे.त्यामुळे संवाद लुप्त होत आहेत.तरूणांनी चांगले विचारांचा वारसा पुढे चालविणे गरजेचे आहे.

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार, दि. २६ जानेवारी २०२६ ●

## बीडमध्ये राष्ट्रध्वजाचा अवमान

### वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर गुलाम नबी काझी यांच्या विरोधात तक्रार दाखल

**बीड । प्रतिनिधी**

येथील काझी नगर भागात राहणारे महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) समीर गुलाम नबी काझी यांच्या घरावर लावलेला राष्ट्रध्वज फाटलेल्या स्थितीत असल्यामुळे तिरंग्याचा अपमान झाल्याची तक्रार बीड पोलीस अधीक्षकांकडे करण्यात आली आहे. याप्रकरणी त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी अर्जदार शेख आमेर यांनी ▶▶ उर्वरित पान २ वर





**● काय आहे प्रकरण ? ●**

तक्रारदार शेख आमेर यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयात दिलेल्या पत्रानुसार, समीर गुलाम नबी काझी यांच्या काझी नगर येथील निवासस्थानी राष्ट्रध्वज फडकवण्यात आला होता. हा तिरंगा गेल्या अनेक दिवसांपासून सतत घरावर लावलेला आहे. मात्र, वाऱ्यामुळे किंवा इतर कारणांमुळे हा ध्वज फाटून खाली आला होता. अशा फाटलेल्या आणि विद्रूप स्थितीतही ध्वज तसाच ठेवल्याने राष्ट्रध्वजाचा अवमान झाल्याचे तक्रारदाराने म्हटले आहे.

## प्रजासत्ताक दिनी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण



**बीड । प्रतिनिधी**

भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा समारंभ सकाळी ०९.१५ वाजता दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी पोलिस मुख्यालय, कवायत मैदान, नगर रोड बीड येथे बाबासाहेब पाटील, मंत्री, सहकार, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास सकाळी ८.३० वाजेपूर्वी सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन बीड जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. मंत्री महोदय यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे. रविवार दिनांक २५ जानेवारी २०२६ रोजी रात्री. ०८:३० वाजता शासकीय विश्रामगृह बीड येथे आगमन व राखीव. सोमवार दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी, ०८:४५ वा. शासकीय विश्रामगृह बीड येथून पोलिस मुख्यालयाकडे मोटारीने प्रयाण, सकाळी ०९:१० वा. पोलिस मुख्यालय बीड येथे शासकीय ध्वजारोहण समारंभ व इतर शासकीय कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी १०:४५ वा. शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. दुपारी १२:३० वा. बीड येथून नेकनूर मार्गे चाकरवाडी ता.बीड कडे मोटारीने प्रयाण. दुपारी ०१.:१५ वा. चाकरवाडी ता.जि. बीड येथे आगमन व माऊली महाराज यांच्या समाधीचे दर्शन. दुपारी ०१:४५ वा. चाकरवाडी ता.जि. बीड येथून केज - अंबाजोगाई मार्गे अहमदपुर कडे मोटारीने प्रयाण.

## प्रजासत्ताक दिना निमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

प्रजासत्ताक दिना निमित्त बीड मध्ये कलाकार ग्रुप प्रस्तुत बीड येथील जेष्ठ नागरिक व बीड पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन. दिनांक २६/०१/२०२६ रोजी प्रजासत्ताक दिना निमित्त कलाकार ग्रुप प्रस्तुत बीड येथीलजेष्ठ नागरिक व बीड पोलीस आयोजित सांस्कृतिक कराओक जुनी व नवी गाणे, नृत्य ,देशभक्ती पर गीत कार्यक्रमाचे आयोजन संगम हॉल जुन्या एस. पि. ऑफिस समोर सायंकाळी ठीक ५.००वाजता करण्यात आले आहे कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून बीड चे मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कांवत यांची उपस्थिती लाभणार आहे हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून विनामूल्य आहे तरी सर्व रसिक श्रोत्यांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे कलाकार ग्रुप च्या वतीने संयोजक अॅड अविनाश गडगे,श्री.बबन वडमारे यानी आवाहन केले आहे.

## अॅड सुदर्शन साळुंके यांचा वाढदिवस सादोळ्यात रक्तदान करून वाढदिवस साजरा



**माजलगाव । प्रतिनिधी**

संभाजीनगर खंडपीठातील प्रसिद्ध विधीज्ञ सुदर्शन जीवनराव साळुंके यांचा वाढदिवस सादोळा येथे पन्नास जणांनी रक्तदान करून साजरा केला आहे या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. वाढदिवस म्हटलं कि डीजे बॅनर फटाके आधी वाफळ खर्च करून पैशाची व्यर्थ उधळण केले जाते परंतु सादोळा येथील युवकांनी अशा खर्चाला बगल देऊन विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप वाटर फिल्टर चे वाटप आधी उपक्रम राबवले जातात यावर्षी तर सादोळा येथील युवकांनी दिनांक २५ जानेवारी रोजी सकाळी अकरा वाजता प्राथमिक आरोग्य केंद्र सादोळा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करून वाढदिवस साजरा केला आहे या रक्तदान शिबिरात ५० रक्तदात्यांनी रक्तदान करून वाढदिवस साजरा केला आहे या कार्यक्रमास च्या अध्यक्षस्थानी शेतकरी नेते जगदीश फरतडे होते तर उद्घाटक म्हणून शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले उपस्थित होते या कार्यक्रमास प्रमुखात येते म्हणून नगरसेवक विजय शिंदे डॉक्टर पारगावकर डॉक्टर घुमरे जीवन अण्णा सोळंके नटू तात्या सोळंके बबन बाप्पा सोळंके प्राध्यापक प्रदीप सोळंके मुकुंद काका सोळंके प्रल्हाद बापू सोळंके अर्जुन तात्या सोळंके चेअरमन अंकुश शिंदे प्रल्हादराव सोळंके संदिपान भाऊ सोळंके गणेश मामा सोळंके आधी प्रमुख ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शहाजी सोळंके विश्वंभर सोळंके पवन सोळंके ओंकार सोळंके सुनील खंडागळे बाबुराव शिरसाट विशाल सुरोशे दत्ता सातपुते एडवोकेट लखन सोळंके लखन नवगिरे प्रमोद सोळंके विक्रम सोळंके बाळासाहेब सोळंके अमर सोळंके सुरज देशमुख गजानन सोळंके आधी तरुणांनी परिश्रम घेतले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार गोविंद गोचडे यांनी मानले या कार्यक्रमास गावातील तरुण ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिथे शिक्षणाचे मूल्य जपले जाते, तिथेच मुले खऱ्या अर्थाने घडतात : उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे

### तुलसी इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा जल्लोषात संपन्न; विद्यार्थ्यांच्या कलागुणांनी वेधले बीडकरांचे लक्ष



**बीड । प्रतिनिधी**

पालक नशीबवान आहेत की त्यांची मुले अशा शाळेत शिक्षण घेत आहेत, जिथे खऱ्या अर्थाने शिक्षणाची जाण जपली जाते. रोडे सरांच्या दूरदृष्टीमुळेच या संस्थेतून सुसंस्कृत व जबाबदार पिढी घडत आहे. जिथे शिक्षणाचे मूल्य जपले जाते, तिथेच मुले खऱ्या अर्थाने घडतात, असे गौरवपूर्ण प्रतिपादन जिल्हा परिषद बीडचे उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे यांनी केले. येथील तुलसी इंग्लिश स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलन सोहळ्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. पांगरी रोडवरील सौभाग्य लॉन्स येथे रंगलेल्या या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे होते. त्यांनी संस्थेच्या शैक्षणिक प्रगतीचा ▶▶ उर्वरित पान २ वर



*श्री.अशोकजी कदम जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नांदेड यांचा निवडी बद्दल सत्कार : सहायक निबंधक प्रशासक सहकारी संस्था बीड. येथे अशोक कदम यांची जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नांदेड, या पदावर पदोन्नती झाल्या बद्दल त्यांचा सत्कार करताना भागवत वराट, बाळासाहेब गव्हाणे, राजेंद्र काळे, बाबासाहेब तिपाले यांच्या सह अनेक कर्मचारी उपस्थित होते.*

## अपघातग्रस्त तरुणाला वेळेत मदत करणाऱ्या ढाकणे दाम्पत्याचा बीड शहर बचाव मंचाच्या वतीने प्राचार्य डी. जी. तांदळे सर यांच्या हस्ते सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

मौजे जोला (ता. केज) येथील सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई बाजीराव ढाकणे व सामाजिक कार्यकर्ते बाजीराव नवनाथ ढाकणे यांनी अपघातग्रस्त तरुणाला वेळेत मदत करून माणुसकीचा आदर्श निर्माण केला. त्यांनी धिरज भवर (रा. हरीनारायण आष्टा, ता. आष्टी) या तरुणास १०८ रुग्णवाहिकेतून बीड येथील जिल्हा रुग्णालयात



उपचारासाठी दाखल केले. या उल्लेखनीय कार्याबद्दल मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक आदरणीय प्राचार्य डी. जी. तांदळे सर यांनी सौ आशाताई ढाकणे व बाजीराव ढाकणे दाम्पत्याचा सत्कार करून विशेष कौतुक केले. केज-बीड रस्त्यावर अपघात झाल्यानंतर जखमी तरुणाला तातडीने उपचार मिळणे गरजेचे होते. अशा स्थितीत सौ. आशाताई ढाकणे व बाजीराव ढाकणे यांनी क्षणाचाही विलंब न करता १०८ रुग्णवाहिकेला संपर्क साधला. जखमी तरुणास त्वरित रुग्णवाहिकेतून बीड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आल्याने त्याच्यावर तातडीचे उपचार सुरू होऊ शकले. वेळेत मदत मिळाल्याने पुढील उपचाराची प्रक्रिया सुलभ झाली, असेही सांगण्यात आले.

या प्रसंगी प्राचार्य डी. जी. तांदळे सर यांनी ढाकणे दाम्पत्याच्या कार्याचे कौतुक करताना, अपघात किंवा संकटाच्या वेळी मदतीला धावून जाणे हीच खरी समाजसेवा आहे. अशा माणुसकीच्या कृतीमुळे समाजात सकारात्मक संदेश जातो, असे गौरवोद्गार काढले. तसेच नागरिकांनी अपघातस्थळी फक्त गर्दी न करता जखमींना तातडीने मदत करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. ढाकणे दाम्पत्यानेही गरजूला मदत करणे हे आपले सामाजिक कर्तव्य आहे. अपघातस्थळी मदतीला धावून गेल्यास ▶▶ उर्वरित पान २ वर




*माजलगाव धारूर येथे माधव तात्या निर्मळ यांच्या मातोश्री सोजरबाई अंबादासराव निर्मळ यांचे नुकतेच अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. असता त्यांचा कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन करतना संतोष रासवे कल्याण कसपटे जगन्नाथ खेत्री उपस्थित सर्व*


## 'मोरांना अभय द्या' बीड येथील प्रतिष्ठित जोशी परिवाराचा हळदी कुंकवाचा सामाजिक संदेश

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील शाहूनगर भागातील ज्येष्ठ नागरिक श्री.बाळासाहेब जोशी यांच्या निवासस्थानी मातोश्री निवास येथे राष्ट्रीय पक्षी मोर ही संकल्पना घेऊन हळदी-कुंकवाची सजावट व देखाव्यातून मोराचे दैनंदिन जीवनातील महत्त्व विशद करणारी संकल्पना मांडण्यात आली होती. या प्रसंगी कुटुंबीय सौ. रुपाली नितीन जोशी, सौ.अश्विनी नरेंद्र जोशी, सौ. सारिका निलेश जोशी यांनी मिळून नायगाव मयूर अभयारण्य देखावा उभारला होता. या मध्ये मोरपिसे विकण्यासाठी मोरांना मारू नका, खाली पडलेले मोरपीस वापरा. नायगाव मयूर अभयारण्य हे बीड जिल्हावासियांचे भूषण असून मोरांना अभय देऊन अभयारण्य संरक्षण आणि संवर्धन आपली



जबाबदारी हा संदेश दिला. माता लक्ष्मी, माता सरस्वती,भगवान कार्तिकेय यांचे मयूर वाहन, मोरगाव मयूरेश्वर, भगवान श्रीकृष्ण यांचे मुकुटामध्ये विराजित मयूरपंख, संत ज्ञानेश्वर लेखणी यातून मोरपिसाचे पौराणिक महत्त्व अधोरेखित करण्यात आले तसेच मोराचे वास्तुशास्त्रीय महत्व सांगताना मनःशांती, आरोग्य रक्षण, सुख समृद्धी, सकारात्मक ऊर्जा, यशप्राप्ती , शत्रु संरक्षक,राहु दोष मुक्ती, सर्जनशीलता वृद्धी या बाबींवर प्रकाश टाकून वास्तु दोष निवारक मयूर प्रतीकात्मक पद्धतीने दर्शविण्यात आले होते. मोर राष्ट्रीय पक्षी का आहे? त्याची सामान्य ओळख, सौंदर्य, इतर पक्षांपेक्षा असलेले वेगळेपण, नैसर्गिक कीटकनाशक, देशव्यापी अस्तित्व या सर्व लोकपयोगी गोष्टी देखाव्यातून प्रतीकात्मक पद्धतीने सामाजिक संदेश देत ठळकपणे दर्शविण्यात आल्या होत्या. चारशे महिलांनी या प्रसंगी हळद- कुंकू तसेच वाण घेऊन ही सुंदर संकल्पना ठेवल्या ▶▶ उर्वरित पान २ वर


तन्मय इलेक्ट्रिशियन अँड इलेक्ट्रॉनिक्स
प्रोप्रायटर रामेश्वर प्रेमचंद तोष्णीवाल
किल्ले धारूर जिल्हा बीड
संपर्क : ८८०५७७७१११

रजि.नं.बीएचआर/पीआरडी/एल-१३८दि.२१-१२-७० फो.२२३३३९
बीड जिल्हा सहकारी मजूर संस्थाचा सहकारी संघ मर्यादित,बीड
चेअरमन:श्री.बन्सीधर एकनाथराव सिरसाट,अंबाजोगाई जि.बीड
लक्ष्मण नगर,भगवानबाबा प्रतिष्ठानच्या पश्चिमेस,बार्शी रोड,बीड ता.जि.बीड


श्री.अमृत श्रीरंग रसाळ
व्हा.चेअरमन


श्री.बी.ई.सिरसाट
चेअरमन


प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

❋ संघाची वैशिष्ट्ये
१) संघाची स्वत:चे मालकीची दोन मजली इमारत.
२) मजूर संस्थेच्या अडीअडचणी सोडवण्यात अग्रेसर.
३) सभासद मजूर संस्थांना कामे मिळवून देण्यात अग्रेसर
❋ संचालक मंडळ ❋
श्री.जटाळ बद्रीनाथ दुधाराम,माने दिलीप विठ्ठलराव,सोनवणे भगवान काकासाहेब, शेख शब्बीर मन्सब,सोनवणे माधव सर्जेराव, तिडके परमेश्वर दत्तात्रय, नागरगोजे भास्कर धोंडीराम ,क्षिरसागर आनंद सुभाष, राठोड अंकुश दगडु,गोरे वसंत भुजंगराव,सौ.देसाई सुनिता काकासाहेब, सौ.कटाळे राधाबाई नामदेव,सौ.हावळे शकुंतला बाळासाहेब,सौ.देशमुख संध्या मंगेश
तज्ञ संचालक:- सिरसाट सुनिल बापुराव,चौधरी मुजफ्फर सुलतान व सर्व कर्मचारी वृंद